# महाराष्ट्र विधानपरिषद
## पत्रक भाग दोन
### गुरुवार, दिनांक २० जून, २०२४ / ज्येष्ठ ३०, १९४६ (शके)

**४०. औचित्याचे मुद्दे ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय विधानपरिषद सदस्यांना कळविण्यात येते की :-**

१. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या गुरुवार, दिनांक २७ जून, २०२४ पासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होणाऱ्या सन २०२४ च्या तृतीय (पावसाळी) अधिवेशनासाठी द्यावयाचे औचित्याचे मुद्दे गुरुवार, दिनांक २७ जून, २०२४ पासून सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.०० या वेळेत **PROIS** या संगणकीय प्रणालीवर स्वीकारण्यात येतील.

२. **ONLINE** पध्दतीने प्राप्त होणाऱ्या औचित्यांच्या मुद्द्यांना संगणकीय प्रणालीद्वारे आपोआपच अनुक्रमाने नोंदणी क्रमांक दिला जाईल व त्याबाबत मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचा निर्णय अंतिम असेल.

३. औचित्याचे मुद्दे पूर्णत: **ONLINE** पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी पुन्हा त्याच विषयाची पुनरावृत्ती करणारी सूचना **OFFLINE** पध्दतीने दिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही.

४. औचित्याच्या मुद्द्याचा विषय हा गंभीर स्वरुपाच्या व तातडीच्या सार्वजनिक महत्वाच्या कोणत्याही बाबीसंबंधातील, स्पष्ट, एकाच विभागाशी संबंधित, मुद्देसूद व थोडक्यात ठेवून सूचनाधीन विषयाचा सारांश २ ते ३ ओळींमध्ये असणे आवश्यक आहे. तसेच सूचनेचा विषय ज्या विभागाशी संबंधित आहे त्या विभागाचे नांव स्पष्टपणे दर्शविण्यात यावे.

५. औचित्याचे मुद्दे स्वीकृती संबंधी व स्वीकृत मुद्दे सभागृहात घेण्यासंबंधीचा पूर्ण अधिकार मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचा राहील.

**विधान भवन,**
मुंबई.
दिनांक : २० जून, २०२४

**जितेंद्र भोळे**
सचिव (१) (का.)
महाराष्ट्र विधानपरिषद

..२/-

**याची प्रत :-**

**१)** महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य.

**२)** मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

**३)** मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

**४)** मा.सचिव (१) (का.), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक.

**५)** मा.सचिव (२) (का.), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक.

**६)** महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.

**७)** महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.

**८)** संगणक कक्ष (WEBSITE)

**९)** एम.के.सी.एल. प्रशिक्षण विभाग.

---------